नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७५ Issue - 175 | वार - रविवार दि. २२ नोव्हेंबर २०२६ Blow- Sunday Date 22 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

राज्यावरील दुष्काळाचे सावट दूर होऊन बळीराजा व जनतेच्या जीवनात सुख-समृद्धी नांदू दे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पांडुरंगाला साकडे; नांदेड जिल्ह्यातील सुधाकर शिंदे दाम्पत्याची मानाचे वारकरी म्हणून निवड; एसटीचा वर्षभर मोफत प्रवास पास प्रदान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर (जिमाका) : राज्यातील दुष्काळी परिस्थिती दूर होऊन बळीराजा आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सुख, समृद्धी व समाधान नांदू दे, असे साकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले.

कार्तिकी यात्रा २०२६ निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आयोजित शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी सुधाकर दशरथ शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली. यानंतर मंदिर समितीच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे; कार्तिकी यात्रेतील भाविकांसाठी उत्कृष्ट सुविधांची व्यवस्था केल्याबद्दल प्रशासनाचे कौतुक

यावेळी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार संजय जाधव, आमदार अभिजित पाटील, बापूसाहेब पठारे, राजू खरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, समिती सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेदरम्यान लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. सध्या संपूर्ण पंढरपूर भक्तिमय वातावरणाने भारावून गेले आहे. आपण सर्वजण येथे वारकरी भावनेने येतो. सर्वसामान्य वारकऱ्यांना श्री विठ्ठलाचे दर्शन सुलभतेने व कमी वेळेत मिळावे, यासाठी व्हीआयपी दर्शन बंद करण्यात आले आहे. त्यामुळे दर्शनासाठी लागणारा वेळ कमी होऊन वारकऱ्यांना लवकर दर्शनाचा लाभ मिळत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. वारीच्या नियोजनाबाबत प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवण्यात आला असून, भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन केले आहे. कार्तिकी यात्रेदरम्यान भाविकांना उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे कौतुक केले. राज्यातील ३१० तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात (पान २ वर..)



सोलापूर जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची माळ सचिन दादांच्या गळ्यात...

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



अक्कलकोट/ प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडीकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून,या महत्त्वाच्या पदासाठी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे नाव आघाडीवर असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.त्यांच्या नावावर अध्यक्षपदासाठी मोहर उमटल्यास अक्कलकोटच्या राजकीय शिरपेचात मानाचा तुरा खोवला जाणार असून,जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात अक्कलकोटला मोठे नेतृत्व मिळण्याची संधी निर्माण होऊ शकते.

सचिन कल्याणशेट्टी यांचे राजकीय वजन आणि संघटनात्मक ताकद पाहता त्यांच्या दावेदारीकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. भारतीय जनता पक्षाची अक्कलकोटसह जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.राजकीय समीकरणांमध्ये बदल घडवून आणताना कार्यकर्त्यांची मोट बांधणे,पक्षाला सत्तेच्या केंद्रस्थानी नेण्यासाठी प्रयत्न करणे आणि स्थानिक पातळीवर भाजपचा प्रभाव वाढवणे, या बाबींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

विशेष म्हणजे,जिल्ह्यातील बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये कल्याणशेट्टी यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. पक्षनिष्ठा, संघटनात्मक काम आणि राजकीय यशाची मालिका यामुळे त्यांनी जिल्ह्याच्या राजकारणात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विश्वासातील नेतृत्व म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते,अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी त्यांच्या नावाला कितपत पसंती मिळते,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा बँकेचे अध्यक्षपद हे केवळ प्रतिष्ठेचे पद नसून जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील महत्त्वाचे सत्ताकेंद्र मानले जाते.अशा पदावर अक्कलकोटच्या नेतृत्वाला संधी मिळाल्यास तालुक्याच्या राजकीय प्रतिष्ठेला निश्चितच नवी उंची मिळू शकते.

ओबीसी विभागामार्फत भटके-विमुक्तांच्या कल्याणासाठी राबविलेल्या अभियानाची केंद्रीय स्तरावर दखल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : भटके-विमुक्त प्रवर्गातील नागरिकांना शासकीय प्रमाणपत्रे मिळवून देऊन त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विशेष अभियान आणि तृतीयपंथीयांसाठी राज्यातील एसटी बसस्थानकांवर स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारण्याचा निर्णय या उपक्रमांची केंद्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. या अभियानाच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना शासकीय योजनांच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचे देशपातळीवरील कार्यशाळेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री, राज्यांचे मंत्री यांनी विशेष कौतुक केले.

नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, नितीन नबीन यांच्या उपस्थितीत देशातील विविध राज्यांच्या सामाजिक न्याय आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मंत्र्यांची 'समावेशी नीती संकल्प' कार्यशाळा झाली. महाराष्ट्राच्या वतीने या उपक्रमांची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या मार्गदर्शनात अभियानाच्या माध्यमातून राज्यातील विविध जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात सुमारे ७६ हजार शासकीय कागदपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. भटके-विमुक्त समाजातील अनेक नागरिकांकडे आवश्यक कागदपत्रे नसल्यामुळे त्यांना शासकीय योजना आणि विविध सुविधांचा लाभ मिळविताना अडचणी येतात. ही बाब लक्षात घेऊन इतर मागास बहुजन कल्याण विभागाने महसूल व इतर विभागांच्या सहकार्याने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या माध्यमातून पात्र नागरिकांना आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर देण्यात येत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत अभियानाचे कौतुक

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा, संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरत आहे. नागरिकांपर्यंत थेट पोहोचून त्यांच्या अडचणी जाणून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेणे आणि त्यांना शासकीय योजनांशी जोडणे, अशा विविध स्तरांवर काम करण्यात येत आहे. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध सेवांचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. या अभियानाच्या माध्यमातून साध्य झालेल्या कामाचे व्यापक स्वरूपात दस्तऐवजीकरण करण्याचे महत्त्वही बैठकीत अधोरेखित करण्यात आले. अभियानाची व्याप्ती, नियोजन, अंमलबजावणीची कार्यपद्धती, यशस्वी लाभार्थ्यांचे अनुभव, सहभागी अधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांचे योगदान, विभागाचे मंत्री आणि सचिव यांचे अनुभव यांचा समावेश असलेला माहितीपूर्ण व्हिडिओ आणि सविस्तर दस्तऐवजीकरण तयार करण्यात येणार आहे.

भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना केवळ प्रमाणपत्रे उपलब्ध करून देणे एवढ्यापुरते या अभियानाचे स्वरूप मर्यादित नसून, त्यांना शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देत विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा या उपक्रमाचा व्यापक उद्देश आहे. पहिल्या टप्प्यातील कामाच्या अनुभवातून अभियानाची पुढील दिशा निश्चित करण्यास मदत होणार आहे. पुढच्या वर्षी ६ ते ८ जानेवारी दरम्यान पुन्हा हे अभियान राबविण्यात येणार आहे. सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने राबविलेल्या या उपक्रमांची राष्ट्रीय स्तरावर घेतलेली दखल राज्यासाठी महत्त्वाची बाब असून, सामाजिक समावेशकता, सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल अधिक व्यापक होत असल्याचे यातून स्पष्ट होते.

१० ते २४ जानेवारीदरम्यान स्वयं-गणना; २५ जानेवारीपासून घरोघरी लोकसंख्या गणना

जनगणना २०२७ च्या कामास जिल्हा प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे : मुख्य सचिव राजेश अग्रवाल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यातील लोकसंख्या गणनेचे काम अचूक, पारदर्शक आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने या कामास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. जनगणनेच्या माध्यमातून संकलित होणारी माहिती पुढील नियोजन आणि विविध विकासकामांसाठी महत्त्वपूर्ण असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले.

जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रधान जनगणना अधिकाऱ्यांची राज्यस्तरीय परिषद आज सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्घाटन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या आभासी उपस्थितीत झाले.

जनगणनेतील माहिती अचूक असणे महत्त्वाचे - डॉ. निरुपमा डांगे



संयुक्त सचिव (भारत सरकार) व मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, महाराष्ट्र डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी जनगणनेतील माहिती अचूकपणे संकलित करण्याचे महत्त्व विशद केले. जनगणनेतील त्रुटींचा परिणाम मतदारसंघ पुनर्रचना, वैधानिक आरक्षण तसेच आगामी दशकातील लोकसंख्याविषयक मूलभूत आकडेवारीवर होऊ शकतो. त्यामुळे राज्यभरात तैनात करण्यात येणाऱ्या सुमारे २.८४ लाख प्रगणक व पर्यवेक्षकांनी प्रत्येक व्यक्तीची नोंद होईल, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

बेघर व्यक्ती, वसतिगृहे, कारागृहे, हॉटेल्स, पेइंग गेस्ट निवासस्थाने तसेच दुर्गम आणि वंचित भागांतील लोकसंख्येची नोंद घेण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यासाठी ४० प्रश्नांची डिजिटल प्रश्नावली, प्रगणकांसाठी पीई मोबाइल प, ऑनलाइन स्वयं-गणना आणि रिअल-टाइम देखरेख प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

शहरी भागातील आव्हानांचा विचार करून नियोजन करा - डॉ. के. एच. गोविंदराज

अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांनी शहरी भागातील जनगणनेदरम्यान येणाऱ्या आव्हानांकडे लक्ष वेधले. महाराष्ट्राच्या लोकसंख्येतील सुमारे ५० टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत असल्याने स्थलांतर, नागरिकांची सततची येजा, दाट वस्ती आणि शहरांचा विस्तार यांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बंद किंवा रिकाम्या घरांसाठी आवश्यकतेनुसार पुन्हा भेटी देणे, प्रगणकांची नियुक्ती व प्रशिक्षण वेळेत पूर्ण करणे, तसेच त्यांना आवश्यक सुविधा आणि मानधन उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला.

प्रशिक्षण आणि पूर्वतयारी वेळेत पूर्ण करा - रणजित सिंग देओल

प्रधान सचिव व राज्य नोडल अधिकारी रणजित सिंग देओल यांनी जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या वेळापत्रकाची आणि राज्यातील तयारीची माहिती दिली. प्रगणक व पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या, प्रशिक्षण आणि संबंधित प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांनी जिल्हास्तरीय प्रशिक्षणात सहभागी होऊन कामकाजाचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

जनगणना २०२७ चे राज्यातील वेळापत्रक

महाराष्ट्रात १० ते २४ जानेवारी २०२७ या कालावधीत नागरिकांना ऑनलाइन स्वयं-गणना पोर्टलद्वारे स्वतःची माहिती नोंदवता येणार आहे. त्यानंतर २५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन लोकसंख्या गणना करतील. २८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री बेघर लोकसंख्येची गणना करण्यात येईल, तर १ ते ५ मार्च २०२७ या कालावधीत पुनरावलोकन फेरी होणार आहे.

या टप्प्यात नागरिकांची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक आणि आर्थिक माहिती संकलित करण्यासाठी ४० प्रश्नांची डिजिटल प्रश्नावली वापरण्यात येणार आहे. यामध्ये नाव, कुटुंबप्रमुखाशी असलेले नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, धर्म, जात, दिव्यांगत्व, मातृभाषा, शिक्षण, व्यवसाय, रोजगार आणि स्थलांतर यासंबंधी माहितीचा समावेश आहे.

परिषदेत जनगणना अधिनियम व नियम, पीई मोबाइल प, एचएलबीसी आणि सीएमएमएस पोर्टल, गणना क्षेत्रांची निश्चिती, जनजागृती आणि देखरेख यासंबंधी तांत्रिक सत्रे घेण्यात आली. मास्टर ट्रेनर्स, जिल्हा व चार्ज अधिकारी आणि तांत्रिक सहाय्यकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण सुरू आहे. यानंतर प्रगणक आणि पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.

परिषदेस नवी दिल्ली येथील भारताचे महानिबंधक कार्यालयाचे उपमहानिबंधक (सी अँड टी) जसपाल सिंग, सर्व विभागीय आयुक्त, राज्यातील प्रधान जनगणना अधिकारी, जनगणना कार्य संचालनालय, मुंबई तसेच महाराष्ट्र शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अक्कलकोट आयटीआयमध्ये कौशल्य पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न





अखिल भारतीय व्यवसाय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट येथे कौशल्य पदवीदान समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अखिल भारतीय व्यवसाय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचा यावेळी प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आयएमसी अध्यक्ष श्री. राजशेखर हिप्परगी , आयएमसी सदस्य श्री. कमलाकर सोनकांबळे , प्रसिद्ध उद्योगपती श्री. विलास कोरे आणि युवा उद्योजक श्री. गजानन पाटील यांचे संस्थेचे गटनिदेशक तथा प्रभारी प्राचार्य श्री. काशीद सर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यानंतर सौ. रेणुका गवल मॅडम यांनी कार्यक्रमाची प्रास्ताविक मांडणी केली. यावेळी आयएमसी सदस्य श्री. कमलाकर सोनकांबळे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करताना कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा उद्योग उभारून भावी उद्योजक बनण्याचे आवाहन केले. तसेच सर्व प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांच्या हस्ते विविध ट्रेडमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या गुणवंत प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र व पुष्प-गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचे यावेळी उपस्थितांनी कौतुक केले.

सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे प्राचार्य श्री. कांबळे साहेब यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. तसेच गटनिदेशक तथा प्रभारी प्राचार्य माननीय श्री. काशीद सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मंठाळे सर यांनी केले, तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील शिल्प निदेशक श्री. शिकलगार सर, सौ. गवल मॅडम, श्री. बगले सर, श्रीमती गेज-ले मॅडम, श्री. मंठाळे सर, श्री. स्वामी सर, श्री. कोणापुरे सर, श्री. वाघमारे सर, श्री. लेबे सर, श्री. बिराजदार सर, श्री. सोनंद सर, श्री. खंदारे सर, श्री. माडेकर, श्रीमती चव्हाण तसेच संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

कौशल्य शिक्षणातून रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण करण्याचा संदेश या समारंभातून देण्यात आला.

घाटकोपर मनपा एन विभागात वस्ती स्वच्छता योजनेच्या नावाखाली लाखो रुपयांचा भ्रष्टाचार ? प्रभाग क्रमांक १२७ मधील रामनगर (अ)मध्ये कामे न करताच बिलांची खैरात; या भ्रष्टाचाराला नेमका कोणाचा आशीर्वाद?

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

घाटकोपर/केतन भोज : मुंबई महानगरपालिकेच्या घाटकोपर मनपा एन विभागातील प्रभाग क्रमांक १२७, रामनगर (अ) परिसरात वस्ती स्वच्छता योजनेच्या कामकाजाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.परिसरात प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारची स्वच्छतेची कामे झालेली दिसत नसताना या योजनेच्या नावाखाली लाखो रुपयांची बिले काढली जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक स्तरावरून केला जात आहे.जर प्रत्यक्ष कामे न करताच सरकारी निधीची बिले मंजूर केली जात असतील,तर हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाचा विषय नसून सार्वजनिक निधीच्या संभाव्य गैरवापराचा गंभीर प्रकार ठरू शकतो.वस्ती स्वच्छता योजना ही झोपडपट्टी आणि दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये स्वच्छता राखण्यासाठी,कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी,परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आणि नागरिकांना आरोग्यदायी वातावरण मिळावे यासाठी राबवली जाते.मात्र,रामनगर (अ) परिसरातील प्रत्यक्ष परिस्थिती आणि योजनेच्या नावाखाली होणाऱ्या कथित आर्थिक व्यवहारांमध्ये तफावत असल्याचा आरोप होत असल्याने या संपूर्ण कामकाजाची पारदर्शकता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

कामे कुठे झाली? मग लाखोंची बिले कशाच्या आधारे?

प्रभागात वस्ती स्वच्छता योजनेअंतर्गत नेमकी कोणती कामे करण्यात आली? किती कर्मचारी नियुक्त करण्यात आले? स्वच्छतेसाठी किती निधी मंजूर झाला? प्रत्यक्ष किती कामे पूर्ण झाली? तसेच संबंधित कंत्राटदार किंवा संस्थेला कोणत्या आधारावर लाखोंची बिले अदा करण्यात आली? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.प्रत्यक्ष कामांचा मागमूस नसताना कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून बिले मंजूर केली जात आहेत का,याची सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे.

मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागातील अधिकाऱ्यांची कंत्राटदार संस्थांकडून कामे न करताच बिले मंजुरीसाठी टक्केवारी ? मग जबाबदारी कोणाची?


या संपूर्ण प्रकरणात घाटकोपर मनपा एन विभागातील संबंधित अधिकारी,घन कचरा व्यवस्थापन विभागाचे जबाबदार अधिकारी आणि बिल मंजुरी प्रक्रियेशी संबंधित यंत्रणेची भूमिका तपासण्याची आवश्यकता आहे.जर आरोपांमध्ये तथ्य असेल,तर प्रत्यक्ष कामांची पाहणी न करता बिलांना मंजुरी देणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून याची संपूर्ण चौकशी करणे गरजेचे आहे.केवळ कागदोपत्री अहवालांच्या आधारे सरकारी निधी खर्च दाखवला जात असेल,तर ही बाब अत्यंत गंभीर आहे.या कथित भ्रष्टाचाराला नेमका कोणाचा आशीर्वाद आहे ?

सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे,प्रभाग क्रमांक १२७ मधील रामनगर (अ) येथे वस्ती स्वच्छता योजनेच्या कामकाजाबाबत एवढे गंभीर आरोप होत असताना संबंधित यंत्रणा कोणाच्या दबावाखाली शांत आहे का? या कामांवर देखरेख ठेवणारे अधिकारी कोण? बिलांची तपासणी कोणी केली? प्रत्यक्ष पाहणीचे अहवाल उपलब्ध आहेत का? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जनतेसमोर मांडली पाहिजेत.

निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करा!

या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. संबंधित कालावधीतील मंजूर निधी,कंत्राटदारांची बिले, हजेरीपत्रके,कामाचे आदेश,प्रत्यक्ष कामांचे फोटो आणि पाहणी अहवाल सार्वजनिक करण्यात यावेत.प्रत्यक्ष कामे न करता बिले काढल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधित कंत्राटदार,संस्था तसेच जबाबदार अधिकारी यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी आणि गैरव्यवहारातून खर्च झालेली रक्कम वसूल करण्यात यावी.मुंबईकरांच्या कररूपाने जमा होणारा पैसा हा नागरिकांच्या सुविधांसाठी आहे,कोणाच्या वैयक्तिक फायद्यासाठी नाही.रामनगर (अ) मधील नागरिकांना स्वच्छ परिसर मिळणार नसेल,तर वस्ती स्वच्छता योजनेच्या नावाखाली खर्च होणाऱ्या लाखो रुपयांचा हिशेब कोण देणार? आता तरी घाटकोपर एन विभाग प्रशासनाने मौन सोडून या प्रकरणातील सत्य जनतेसमोर आणावे.कामे न करता बिले काढली जात असल्याच्या आरोपांची सत्यता तपासून दोषींना संरक्षण न देता त्यांच्यावर कारवाई होणार का,हाच खरा प्रश्न आहे!

मुक्या जीवांसाठी माणुसकीचा झरा! घोळसगावात बळीराजा शेतकरी गटाचा अनोखा उपक्रम



चार ठिकाणी सिमेंटचे हौद, तर झाडांवर पक्ष्यांसाठी जलपात्रांची व्यवस्था; तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत मंगळूरे यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

घोळसगाव : उन्हाळ्यात आणि पाणीटंचाईच्या काळात माणसांसोबतच मुक्या जनावरांना आणि पक्ष्यांनाही पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागते. हीच गरज ओळखून घोळसगाव येथील बळीराजा शेतकरी गटाने सामाजिक बांधिलकी जपत जनावरे आणि पक्ष्यांसाठी पाणपोईची व्यवस्था करून एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे.

या उपक्रमांतर्गत गावातील चार वेगवेगळ्या ठिकाणी सिमेंटच्या हौदांच्या स्वरूपात जनावरांसाठी पाणपोई उभारण्यात आल्या आहेत. तसेच गावातील बहुतांश झाडांना पक्ष्यांसाठी जलपात्रे अडकवून त्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. या पाणपोईचे उद्घाटन तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत मंगळूरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सदस्य अप्पासाहेब किवडे होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत मंगळूरे यांनी बळीराजा शेतकरी गटाच्या सर्व सदस्यांचे विशेष अभिनंदन केले. मुक्या जनावरांसह पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे ही कौतुकास्पद बाब असून, अशा उपक्रमांमधून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडते, असे त्यांनी नमूद केले. तसेच उपस्थित शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

घोळसगावात बळीराजा शेतकरी गटाचा स्तुत्य उपक्रम; जनावरांसह पक्ष्यांसाठी उभारल्या पाणपोई

पंचायत समिती सदस्य अप्पासाहेब किवडे यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. शेतकऱ्यांच्या हितासाठी पंचायत समितीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देऊन पात्र शेतकऱ्यांनी त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना जनावरांच्या चाऱ्यासाठी ज्वारीच्या बियाण्यांचे वाटपही करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सरपंच राजशेखर किवडे, उपसरपंच प्रदीप कोतले, तंटामुक्ती अध्यक्ष संजय होळे, सोसायटीचे चेअरमन दिलीप पाटील, युवा नेते अशोक वर्दे, रामेश्वर पाटील, वैजनाथ वर्दे, भीमाशंकर उमाटे, मुख्याध्यापक हडपद सर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रधान सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मल्लिनाथ सोळसे यांनी केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी बळीराजा शेतकरी गटाचे अध्यक्ष अल्ताफ फकीर, सचिव राजेंद्र काळे, खजिनदार पंडित बादोले, विजयकुमार पाटील, रेवणसिद्ध पडसलगे, विकास काकडे, परमेश्वर पाटील, मल्लिनाथ मंगळूरे, लकप्पा घोडके, सुरेश पाटील, भीमाशंकर आलुरे, सिद्धाराम उमाटे, मल्लिनाथ हडपद, दत्तात्रय कोलाटी, बशीर जमादार, शिवाजी साळुंके, अशोक गायकवाड, अमीन फकीर, आयुब फकीर, महेश किवडे आणि काशिलिंग कोळी यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला गावातील बहुसंख्य शेतकरी, शंभू महादेव विद्या मंदिराचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनावरांची तहान भागविण्यासोबतच पक्ष्यांनाही पाण्याचा आधार मिळावा, या उदात्त हेतूने राबविण्यात आलेल्या बळीराजा शेतकरी गटाच्या या उपक्रमाचे घोळसगाव परिसरातून कौतुक होत आहे.

वाहतूकदारांच्या विविध मागण्यांसाठी ५ डिसेंबरपासून खारघर टोलनाक्याजवळ आमरण उपोषणाचा इशारा : अध्यक्ष राजेंद्र वनवे



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पनवेल/ केतन भोज : महाराष्ट्रातील वाहतूकदारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जय भवानी ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने ५ डिसेंबर २०२६ पासून खारघर टोलनाक्याजवळ आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा जय भगवान ट्रान्सपोर्ट चे अध्यक्ष राजेंद्र वनवे याच्या कडून करण्यात आली आहे. जोपर्यंत वाहतूकदारांच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नसल्याचा निर्धार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. वाहतूकदारांनी शासनाकडे आठ प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये परिवहन विभागाकडील आजपर्यंतचे थकीत दंड पूर्णपणे माफ करावेत, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील स्पीड लिमिट ४० वरून ६० करावे, तसेच पनवेल परिवहन कार्यालयात वाहन पार्सिंगच्या प्रक्रियेदरम्यान होणारी कथित आर्थिक लूट तात्काळ थांबवावी, अशा मागण्यांचा समावेश आहे. तसेच पनवेल येथील ठध एछएठ-त्रह्थ ङखचखढएऊ ढड उएछढठए येथे वाहन पार्सिंगदरम्यान वाहनांना जाणीवपूर्वक फेल केले जात असल्याचा व त्यानंतर आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.वाहतूक पोलिसांकडून आकारण्यात आलेले थकीत दंड पूर्णपणे माफ करावेत, प्रमुख शहरांमध्ये अवजड वाहनांच्या प्रवेशाच्या वेळांबाबत पुनर्विचार करावा, रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर वाहतूक पोलिसांकडून करण्यात येणारी दंडात्मक कारवाई थांबवावी, तसेच शासनाने दंडामध्ये जाहीर केलेली २० टक्के सवलत न देता संपूर्ण थकीत दंड माफ करावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे.याशिवाय ४० फूट फोर्टी टेलरच्या आरसी बुकवर वाहनाची लांबी १६ मीटर अशी नोंद करण्यात यावी, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

या सर्व मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा वाहतूकदारांनी व्यक्त केली आहे. जय भवानी ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे सर्व कमिटी सदस्य तसेच महाराष्ट्रातील विविध वाहतूकदार संघटना या आंदोलनाला पाठिंबा देणार असल्याचे सांगण्यात आले आहे.५ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या आमरण उपोषणामुळे वाहतूकदारांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले जाणार असून, आता शासन या मागण्यांबाबत काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण वाहतूकदार वर्गाचे लक्ष लागले आहे.

राज्यावरील दुष्काळाचे सावट दूर होऊन बळीराजा व जनतेच्या जीवनात सुख-समृद्धी नांदू दे

(पान १ वरून..)

आली आहे. खरीप व रब्बी हंगामातील पाऊस अत्यंत कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले असून, शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. अशा संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. दुष्काळी परिस्थिती दूर होऊन चांगला पाऊस पडावा, बळीराजावरील संकट दूर व्हावे आणि त्याच्या जीवनात सुख-समाधानाचे दिवस यावेत, असे साकडे पांडुरंगाला घातल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सर्व मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर तसेच त्यांच्या घरी जाऊन भेटी घेत आहेत. दिवाळीच्या काळात शासनाकडून आर्थिक मदत तत्परतेने वितरित करण्यात आली असून, दुष्काळी परिस्थितीत लागू असलेल्या विविध सवलतीही जाहीर करण्यात आल्या आहेत. आपत्तीच्या काळात शासन शेतकऱ्यांना तातडीने मदत करत असल्याचे त्यांनी सांगितले.

आषाढी व कार्तिकी यात्रेदरम्यान वारकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये दरवर्षी सुधारणा करण्यात येत आहेत. वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याकरिता शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात आहे. दर्शन मंडपासाठी आवश्यक असलेला अतिरिक्त २५ कोटी रुपयांचा निधी पर्यटन विभागामार्फत तत्काळ उपलब्ध करून देण्यात आला आहे. पंढरपूर कॉरिडॉरचे काम सर्व संबंधितांना विश्वासात घेऊनच करण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

कार्तिकी यात्रेच्या नियोजनात जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिल्या असून, सूचनांची तत्परतेने अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांनी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मुख्याधिकारी महेश रोकडे, तहसीलदार सचिन लंगुटे आणि मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण कुमार घम यांच्या कामाचे कौतुक केले. या अधिकाऱ्यांचा उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी तत्परतेने आणि धडाडीने निर्णय घेत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे तसेच मानाचे वारकरी सुधाकर दशरथ शिंदे व त्यांच्या पत्नी प्रणिता सुधाकर शिंदे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते मानाचे वारकरी शिंदे दाम्पत्याचा श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती व वस्त्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळातर्फे देण्यात येणारा एक वर्षाचा मोफत प्रवास पास त्यांना प्रदान करण्यात आला. मंदिर समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री शिंदे यांचाही सन्मान करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते मंदिर समितीच्या 'दैनंदिनी २०२७' चे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले, तर आभार कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी मानले.

कार्तिकी यात्रा २०२६ निमित्त २१ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या शासकीय महापूजेसाठी दर्शन रांगेतील माळकरी भाविकांमधून मानाच्या वारकऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील उंचगाव (खुर्द) येथील शेतकरी सुधाकर दशरथ शिंदे (वय ५८) व त्यांच्या पत्नी प्रणिता सुधाकर शिंदे (वय ५१) यांची मानाचे वारकरी म्हणून निवड झाली. शिंदे दाम्पत्य गेल्या ११ वर्षांपासून नियमित वारी करत असून, त्यांना सुशील व प्रणव हे दोन मुलगे आणि गायत्री व संस्कृती या दोन मुली आहेत. श्री. सागर महाराज वाशिमकर यांच्या मार्गदर्शनाखालील वारकरी परंपरेशी जोडलेले हे दाम्पत्य गेल्या २५ वर्षांपासून माळकरी असून, शेती व्यवसाय सांभाळत भक्तिभावाने वारकरी संप्रदायाची परंपरा जपत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

घुमाण सायकल वारीचा प्रवास प्रेरणादायी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

महाराष्ट्र व कर्नाटकातील १६० सायकल रायडर्सचा सहभाग; पंढरपूर ते पंजाबमधील घुमाण असा २,५०० किलोमीटरचा प्रवास

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या सुमारे २ हजार ५०० किलोमीटरच्या सायकल वारीचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पंढरपूर येथे करण्यात आला. संत नामदेव महाराजांचे विचार आणि संत साहित्याचा प्रसार करणारी ही सायकल वारी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केले.



पालखी सोहळा पत्रकार संघ, भागवत धर्म प्रसारक मंडळ, श्री नामदेव दरबार कमिटी, श्री क्षेत्र घुमाण (पंजाब), समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२२ पासून संत शिरोमणी श्री नामदेव महाराज रथयात्रा व सायकल वारीचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा या उपक्रमाचे पाचवे वर्ष आहे.



दि. २१ नोव्हेंबर रोजी सुरू झालेली ही रथयात्रा व सायकल वारी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा आणि पंजाब या पाच राज्यांतून प्रवास करून दि. १३ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र घुमाण येथे पोहोचणार आहे. तेथे सायकल वारीचा समारोप होणार आहे. त्यानंतर हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांतून प्रवास करीत दि. २१ डिसेंबर रोजी रथयात्रा पुन्हा श्री क्षेत्र पंढरपूर येथे दाखल होणार आहे.

या रथयात्रा व सायकल वारीमध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांतील सुमारे १६० सायकल रायडर्स सहभागी झाले आहेत. यंदा सहभागी रायडर्सची संख्या सर्वाधिक असल्याची माहिती भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी दिली.

संत साहित्याचा प्रचार व प्रसार करण्यासोबतच आरोग्य संवर्धन, पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, प्रदूषण नियंत्रण आणि शिक्षण यांसारख्या सामाजिक विषयांवर जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या शुभारंभप्रसंगी मंत्री भरतशेठ गोगावले, आमदार राजू खरे, पालखी सोहळा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष शंकर टेमघरे, उपाध्यक्ष सुभाष भांबुरे, , सायकल रायडर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. सुभाष कोकणे, यांच्यासह सायकल रायडर्स उपस्थित होते.

खा. ओमराजे निंबाळकर यांच्या पुढाकारातून रोजगार महोत्सव; ५ हजार तरुणांना संधी : संतोष सोमवंशी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा : लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेती आणि शेतीपूरक व्यवसायांसमोर अनेक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. अशा परिस्थितीत सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने धाराशिव येथे २४ नोव्हेंबर रोजी 'खासदार नौकरी महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणाऱ्या या मेळाव्यात सुमारे ८० नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, ५ हजारांहून अधिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य बाजार समितीचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

या पत्रकार परिषदेला युवा हबचे संचालक दीपक पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना संतोष सोमवंशी म्हणाले की, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांत दुष्काळाची तीव्रता वाढत असून आगामी काळात परिस्थिती अधिक कठीण होण्याची शक्यता आहे. या संकटाचा परिणाम ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेवर आणि तरुणांच्या रोजगाराच्या संधींवरही होत आहे. त्यामुळे गावागावांतील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार मिळावा, या हेतूने खासदार रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यासाठी विविध क्षेत्रांतील ८० हून अधिक नामांकित कंपन्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. कंपन्या आणि बँकांच्या माध्यमातून पाच हजारांहून अधिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, मेळाव्यात निवड झालेल्या उमेदवारांना जागेवरच नियुक्तीची संधी आणि नियुक्तिपत्रे दिली जाणार आहेत.

मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक तरुणांनी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. तांत्रिक अडचणींमुळे ऑनलाइन नोंदणी करू न शकणाऱ्या उमेदवारांसाठी २४ नोव्हेंबर रोजी मेळाव्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मात्र, तरुणांनी शक्यतो ऑनलाइन नोंदणी करूनच सहभागी व्हावे, असे आवाहन सोमवंशी यांनी केले.

या रोजगार मेळाव्यासाठी कोणत्याही प्रकारचे नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही. संपूर्ण निवड प्रक्रिया पारदर्शक आणि सुसूत्र पद्धतीने पार पाडण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच, मेळाव्यातून तातडीने नोकरीची संधी न मिळालेल्या उमेदवारांना भविष्यातील रोजगार संधींसाठी 'खासदार जॉब कार्ड' देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीमुळे रोजगाराच्या शोधात असलेल्या ग्रामीण भागातील तरुणांसाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिकाधिक बेरोजगार तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय मॉडर्न पेंटॅथोलोन स्पर्धेत एमआयटीचे घवघवीत यश



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : सोलापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय मॉडर्न पेंटॅथ्या तुला या स्पर्धेमध्ये विविध ऑप्टिकल्स शर्यतीमध्ये आपले कला-कौशल्य दाखवत एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल पंढरपूर येथे शिकणाऱ्या ओमराजे पाटील या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक प्राप्त करत बारामती येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

त्याने प्राप्त केलेल्या या यशाबद्दल प्राचार्य शिवाजी गवळी सर यांनी त्याचे व प्रशिक्षक वैभव चौधरी मनीष संपांगे ऋषिकेश गावडे पल्लवी पाटील यांचे कौतुक केले.

आ. समाधान आवताडे यांच्या जनसंपर्क कार्यालयातील सहकाऱ्यांनी रुग्णांच्या नातेवाईकांना दिला आपुलकीचा घास

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : नेत्याच्या कोणत्याही संग-प्रसंग कामकाजात सावलीसारखा राबता ठेवणारे कार्यालयीन सहकारी म्हणजे त्या नेत्याचं सार्वजनिक जीवनातील खूप मोठे बलस्थान असते. नेता आणि कार्यालयीन सहकारी ही संकल्पना म्हणजे कोणत्याही सार्वजनिक कारभारव्यवस्थेचे प्रभावी अस्त्र मानले जाते. आपण नेत्याकडे सेवेला आहोत ही भावना जबाबदारीचा एक भाग असला तरी कर्तव्याच्या आणि जबाबदारीच्या पलीकडे जाऊन त्या नेत्याप्रती असणारे निर्भेळ प्रेम आणि जिवाभावाचा स्नेह पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या कार्यालयातील सहकाऱ्यांच्या एका विधायक कृतीने आमदार समाधान आवताडे हे पुरते धन्य आणि भावनाविवश झाले आहेत.



२१ नोव्हेंबर या दिवशी आमदार समाधान आवताडे यांचा सुवर्ण महोत्सवी अभिष्टचिंतन दिन संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थितीचे भान ठेवून विविध सामाजिक व सार्वजनिक त्याचबरोबर शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. पदाधिकारी, सहकारी, चाहते व कार्यकर्ते यांच्यामार्फत आमदार अवताडे यांना विविध मार्गाने शुभेच्छांचा वर्षाव होत असताना त्यांच्या मंगळवेढा येथील जनसंपर्क कार्यालयातून त्यांच्या सर्व स्वीय सहाय्यक व इतर कार्यालयीन कर्मचारी यांच्या संकल्पनेतून शुभेच्छा व्यक्त करण्याची एक प्रेरणादायी व अनुकरणीय आणि अनोखी अशी पद्धत समोर आली आहे. ती म्हणजे या सर्व सहकाऱ्यांनी आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवेढा तालुक्यातील शासकीय म्हणजे ग्रामीण रुग्णालय व इतर सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये आरोग्याच्या निरनिराळ्या कारणास्तव उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना व त्यांच्यासोबत असणाऱ्या मंडळींना एक दिवसाचे भोजन देऊन विधायक शुभेच्छा उपक्रमाचा संपूर्ण राज्यामध्ये एक आदर्शवत पायंडा निर्माण केला आहे. सर्वस्वी सहाय्यक व इतर कर्मचारी सहकारी यांनी एकत्रित येऊन आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा. ली. नंदूर या साखर कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे त्याचबरोबर मंगळवेढा पंचायत समितीच्या सभापती दिपाली ताड जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते संबंधित नातेवाईकांना भोजनाचा डबा पोहच केला आहे.

कार्यालयीन सहकाऱ्यांच्या या अनोख्या शुभेच्छांमुळे आ. आवताडे झाले जाम खुश

एखाद्या कार्यालयातील सहकाऱ्यांनी आपल्या नेत्यांप्रती अशी शुभेच्छा संकल्पना राबवणे हे किंबहुना राज्यातील पहिलेच उदाहरण आहे. कार्तिकी एकादशीच्या मंगलदिनी आमदार समाधान आवताडे यांचा वाढदिवस योग साधून आल्याने या सर्व रुग्ण नातेवाईकांना या सहकाऱ्यांनी फराळाचे साहित्य वाटप करून सर्वशक्तीमान भगवंत विठुरायाला अभिप्रेत असणारी संवेदनशील माणुसकी आणि मानवतेचा धर्म जपण्याचे अनमोल कार्य यांच्या माध्यमातून साकार झाले असल्याची भावना या सर्व रुग्ण नातेवाईकांनी व्यक्त करून आमदार समाधान आवताडे यांना निरोगी व आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य साठी आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत पडवळे, डॉ नंदकुमार शिंदे, स्वीय सहाय्यक रावसाहेब फटे, स्वीय सहाय्यक प्रशांत घोंगडे, स्वीय सहाय्यक प्रकाश रोहिटे, स्वीय सहाय्यक नवनाथ शिंदे, स्वीय सहाय्यक अभिजित मोरे, संतोष कोळसे- पाटील, क्लर्क मोनू कोळी, सोशल मीडिया चीफ समन्वयक अजिंक्य केदार, व्हिडिओ क्रिएटर अजय सपताळे, फोटो एडीटर आदित्य लेंडवे, सुरेश सावंजी, बाळकृष्ण गुरव त्याचबरोबर संबंधित हॉस्पिटल मधील आरोग्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बडेजाव न करता समाजभान जपण्यासाठी दिले प्राधान्य

आ. समाधान आवताडे यांचा ५० वा वाढदिवस विविध सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक उपक्रमांनी साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात अनेक सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून दुष्काळ जन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर समाजभान जपण्याची सामाजिक बांधीलकी या निमित्ताने आणखी दृढ झाली आहे. पाण्याच्या भीषण अशा टंचाईग्रस्त दक्षिण भागामध्ये आमदार आवताडे यांच्या वाढदिवसाच्या दिवशीच म्हैसाळ योजनेचे पाणी शेतकऱ्यांच्या शिवाराम ध्ये आल्याने शेतकरी आनंदून गेला आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील स्वच्छ भारत या मिशन अंतर्गत संपूर्ण मतदारसंघामध्ये गावोगावी स्वच्छतेचा जागर करत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वच्छतेसाठी झाडू हातात घेतला. सार्वजनिक व सामूहिक परिसरात यानिमित्ताने अनेकांनी स्वच्छता करत स्वच्छ गाव सुंदर परिसर हा नारा दिला. गोपाळपूर येथील वृद्धाश्रमामध्ये येथील मात्यापित्यांना व पालवी येथील अनाथ बालकाश्रम येथे आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त भोजन देऊन त्यांचा आशीर्वाद घेण्यात आला.

मतदारसंघातील नागरिकांचे व जनतेचे आरोग्य सदृढ आणि सक्षम होण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवेढा ग्रामीण रुग्णालय तसेच भोसे, सलगर बु.व आंधळगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये भव्य मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये नामांकित व तज्ञ आरोग्य अधिकाऱ्यांनी अनेक रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक आणि योग्य सल्ला देत उपचारासंदर्भात मार्गदर्शन केले. त्याचबरोबर आवताडे स्पिनर्स प्रा. ली. येथे चेअरमन संजय अवताडे यांच्या हस्ते आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या आरोग्य शिबिरामध्ये अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक संवेदनशीलतेला आपल्या रक्तदानाच्या रूपाने सहकार्य केले. विविध गावातील प्राथमिक माध्यमिक शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून उद्याच्या उज्वल भारत देशाच्या निर्मितीसाठी योगदान देणाऱ्या यशस्वी पिढ्यांना शिक्षण साक्षरतेसाठी प्रोत्साहन देण्यात आले. पंढरपूर येथील मातोश्री वृद्धाश्रम येथे दोन महिन्याचा शिरा वाटप करण्यात आला पंढरपूर शहरात विविध ठिकाणी व अनवली येथे वारकऱ्यांना फराळ वाटप करण्यात आले..



मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांमध्ये साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण व्यवस्थेचे केंद्रप्रमुख राजाराम सुडके यांच्या संकल्पनेतून आणि नेतृत्वातून वैष्णवी उद्योग समूह व वैष्णवी महिला को-ऑपरेटिव्ह यांच्या वतीने प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांना वही व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. आमदार समाधान आवताडे यांच्या खर्डी येथील सीताराम महाराज, मारुती राया, कोर्टी येथील शंभू महादेव, हुलजंती येथील महालिंगराया त्याचबरोबर लक्ष्मी दहिवडी येथे लक्ष्मी देवी मंदिरात परिपूर्ण स्वास्थ्यसाठी आणि निरोगी आरोग्य संपन्न दीर्घायुष्यासाठी वेगवेगळ्या गावांमध्ये ग्रामदैवतांना अभिषेक करून कार्यकर्त्यांनी प्रार्थना केली आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे पालकमंत्री जयकुमार गोरे व आ. बाबासाहेब देशमुख यांनी दर्शन घेतले



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिनांक २१ रोजी कार्तिक यातील निमित्त एकादशी निमित्त पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार सचिन कल्याण शेट्टी, या सर्वांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

मंदिर समितीसह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा विठ्ठल रुक्मिणीचे मातेचे दर्शन घेऊन त्यांचा येतोच सन्मान करण्यात आला.

सहकार विकास पॅनलच्या प्रचार दौऱ्याला अक्कलकोटमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद

सचिनदादा कल्याणशेट्टी, मिलनदादा कल्याणशेट्टी यांच्यासह दिग्गज नेत्यांची उपस्थिती; मतदारांशी साधला संवाद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व मित्रपक्ष पुरस्कृत सहकार विकास पॅनलच्या प्रचार दौऱ्याला अक्कलकोटमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गुरुवार, दि. २० नोव्हेंबर रोजी लोकापुरे मंगल कार्यालय येथे प्रचार मेळावा पार पडला. यावेळी मान्यवर नेत्यांनी मतदारांशी संवाद साधत सहकार विकास पॅनलच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या प्रचार मेळाव्यास अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, माजी आमदार राजन मालक पाटील, माजी आमदार बबनदादा शिंदे, माजी आमदार दीपक आबा साळुंखे, सुरेश हसापुरे, रणजीत शिंदे, दिग्विजय बागल, प्रणव परिचारक तसेच अक्कलकोटचे नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी, शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची प्रगती महत्त्वाची असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. बँकेचा कारभार अधिक सक्षम, पारदर्शक आणि विकासाभिमुख करण्यासाठी सहकार विकास पॅनलच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले.

एनटी प्रवर्गाचे उमेदवार राजेंद्र बंदीछोडे आणि महिला प्रवर्गाच्या उमेदवार अर्चनाताई घाटगे यांच्यासह सहकार विकास पॅनलचे सर्व उमेदवार या प्रचार मेळाव्यात उपस्थित होते. यावेळी अक्कलकोट परिसरातील मतदार, कार्यकर्ते आणि सहकार क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

सहकार विकास पॅनलच्या प्रचार दौऱ्याला मिळालेला प्रतिसाद पाहता सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत अक्कलकोटमधील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागल्याचे चित्र दिसून आले

विहीर दुर्घटनाग्रस्त मृतांच्या वारसांना प्रत्येकी सात लाखांची आर्थिक मदत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील आंबे येथे झालेल्या विहीर दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना तसेच विजेच्या धक्क्याने मृत्यू झालेल्यांच्या वारसांना राज्य शासन आणि शिवसेनेच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली. शासनाच्या वतीने प्रत्येकी पाच लाख रुपये आणि शिवसेनेच्या वतीने प्रत्येकी दोन लाख रुपये, अशी एकूण सात लाख रुपयांची मदत देण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथे संबंधित वारसांना मदतीचे धनादेश सुपूर्द करण्यात आले.



आंबे येथील विहीर दुर्घटनेत मृत्यू झालेल्या व्यक्तींचे वारस म्हणून रांजणी येथील राधा मंगेश मोरे, राणी सिद्धेश्वर घाडगे तसेच अनवली येथील सिंधू आबासाहेब घोडके आणि लक्ष्मी तानाजी घोडके यांना प्रत्येकी सात लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

तसेच, आंबे येथे दि. २९ जून २०२६ रोजी विजेच्या धक्क्याने लक्ष्मण नागणे व अलका नागणे यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या वारस वैभव नागणे यांनाही शासनाच्या वतीने प्रत्येकी तीन लाख असे एकूण सहा लाख रुपये आणि शिवसेनेच्या वतीने दोन लाख रुपये, अशी एकूण आठ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मदतीचे धनादेश वितरित; शासनाचे पाच लाख, शिवसेनेचे दोन लाख रुपये

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मृतांच्या कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांना धीर दिला. दुर्घटनाग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने ही मदत सुपूर्द करण्यात आली.

यावेळी आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तमराव जानकर, नगराध्यक्षा प्रणिती भालके, जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे उपस्थित होते.

'आयटीआय' चा प्रशिक्षणार्थी हा औद्योगिक विकासाचा आधारस्तंभ : खा.प्रणिती शिंदे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी हा विकासाचा आधारस्तंभ असून हीच खरी संपत्ती आहे, असे प्रतिपादन खासदार प्रणितीताई शिंदे यांनी केले.

सोलापूरच्या विजापूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोलापूरच्या (आयटीआय) वतीने आयोजित पाचवा कौशल्य दीक्षांत समारंभ शुक्रवारी येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात खासदार कु.प्रणिती शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात बोलताना खा.प्रणिती शिंदे यांनी बदलत्या काळातील कौशल्य विकासाची गरज स्पष्ट केली.त्या म्हणाल्या की, आजच्या स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या तांत्रिक युगात तरुणांना केवळ पारंपरिक पदव्यांपेक्षा प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आणि तांत्रिक कौशल्यांची मोठी गरज आहे. 'आयटीआय'सारख्या संस्थांमधून मिळणारे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासोबतच स्वावलंबी आणि आत्मनिर्भर होण्यासाठी भक्कम पाया देतात. आय टी पार्क च्या बरोबरीनेच किंबहुना त्याहीपेक्षा

सोलापुरात म. बसवेश्वर आयटीआयचा पदवीदान समारंभ उत्साहात साजरा

अधिक रोजगारक्षम असलेल्या आय टी आय च्या विकास आणि आधुनिकीकरणावर शासनाने अधिक भर दिला पाहिजे असेही त्यांनी अधोरेखित केले.

संस्था व्यवस्थापन समिती सदस्य व ज्येष्ठ पत्रकार श्री. दशरथजी वडतिले यांनी दीक्षांत समारंभातील यशस्वी प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्राचार्य बिडकर यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमास शहर काँग्रेसचे अध्यक्ष श्री.चेतन नरोटे, युवक अध्यक्ष श्री.गणेश डोंगरे, शिंदे शिवसेना गटाचे नेते श्री.अमोल शिंदे, काँग्रेसचे प्रसिद्धीप्रमुख श्री.तिरुपती परकीपंडला तसेच संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री.दशरथ वडतिले ,संस्थेचे कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य मनोज बिडकर यांनी प्रास्ताविक भाषणात संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर केला.श्री. विजय भांगे व शुभम फसले यांनी सूत्रसंचालन केले तर गटनिदेशक श्री. सिद्राम गोलेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर खा प्रणितीताई यांनी सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यासमवेत बसून छायाचित्रे काढली. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पसरले होते.त्यांनी आयटीआयसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही देऊन विविध धसास लावणार असल्याचे सांगितले.



सलग चार वेळा महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावण्याची देदीप्यमान कामगिरी

वैज्ञानिक उपकरण सादरीकरणात प्रथम व द्वितीय, तर पोस्टर सादरीकरणात प्रथम क्रमांक; दिल्ली येथील राष्ट्रीय प्रदर्शनासाठी तिन्ही सादरीकरणांची निवड

बेंगळुरूच्या राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात शंकरराव शरणप्पा आष्टे प्रशालेचा ऐतिहासिक डंका

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भुरीकवठे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर : बेंगळुरू येथे दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी टाटा पॉवर लिमिटेड आणि अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात शंकरराव शरणप्पा आष्टे प्रशाला, भुरीकवठे (ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) या प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष अभिमानाची बाब म्हणजे, शंकरराव शरणप्पा आष्टे प्रशालेला सलग चार वेळा प्रथम क्रमांक प्राप्त होण्याचा बहुमान या निमित्ताने लाभला असून, प्रशालेने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती, नावीन्यपूर्ण कल्पना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणाऱ्या या राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक उपकरण सादरीकरणामध्ये महाराष्ट्रातून प्रथम व द्वितीय क्रमांक, तर



पोस्टर सादरीकरणामध्ये महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळवून प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या तिन्ही सादरीकरणांची दिल्ली येथे होणाऱ्या पुढील राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. ही लक्ष्मी शिक्षण प्रसारक मंडळ आणि संपूर्ण प्रशालेसाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

वैज्ञानिक उपकरण सादरीकरणात प्रथम क्रमांक – 'सोलर स्वयंचलित पाळणा'!

प्रदर्शनातील वैज्ञानिक उपकरण सादरीकरणामध्ये इयत्ता आठवीतील कु. कोमल सुरेश बेळम आणि कु. स्नेहल सिद्धाराम रायगोंडे या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या 'सोलर स्वयंचलित पाळणा (डेश्ररी ऊीरवश्रश)' या नावीन्यपूर्ण वैज्ञानिक उपकरणाला महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. या यशासह शंकरराव शरणप्पा आष्टे प्रशालेला सलग चार वेळा प्रथम क्रमांक प्राप्त होण्याचा ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित झाला आहे. सौरऊर्जेचा प्रभावी उपयोग करून तयार केलेली ही कल्पक संकल्पना विद्यार्थिनींच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाची, संशोधनवृत्तीची आणि सर्जनशीलतेची साक्ष देणारी ठरली. त्यांच्या या उपकरणाची दिल्ली येथे होणाऱ्या पुढील राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

वैज्ञानिक उपकरण सादरीकरणात द्वितीय क्रमांक – 'सोलर ग्रास कटर'!

याच स्पर्धेत इयत्ता आठवीतील चि. मौलाली नवाजअली इनामदार आणि चि. प्रविण प्रकाश कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'सोलर ग्रास कटर (डेश्ररी ऋर्रीी ऊींिशी)' या नावीन्यपूर्ण वैज्ञानिक उपकरणाला महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. सौरऊर्जेचा वापर करून गवत कापण्याची संकल्पना साकारताना विद्यार्थ्यांनी ऊर्जा संवर्धन, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि आधुनिक वैज्ञानिक विचारांचा सुंदर संगम घडवून आणला. त्यांच्या या उपकरणाचीही दिल्ली येथील पुढील राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

पोस्टर सादरीकरण स्पर्धेत महाराष्ट्रातून प्रथम इयत्ता दहावीतील कु. श्वेता सिद्धाराम पाटील हिने सादर केलेल्या पोस्टरला महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. विषयाची प्रभावी मांडणी, कल्पकता आणि सर्जनशील सादरीकरण यांमुळे तिच्या पोस्टरने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या पोस्टरचीही दिल्ली येथे होणाऱ्या पुढील राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

अशा प्रकारे वैज्ञानिक उपकरण सादरीकरणात प्रथम व द्वितीय क्रमांक आणि पोस्टर सादरीकरणात प्रथम क्रमांक मिळवून शंकरराव शरणप्पा आष्टे प्रशाला, भुरीकवठे येथील विद्यार्थ्यांनी विज्ञान क्षेत्रातील आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. राजकुमार काशिनाथ कुलकर्णी सर, ढंगापुरे सर, श्री. सुतार सर, सौ. लाटे मॅडम, श्री. अजित गवसणे सर, श्री. प्रशांत गायकवाड सर, श्री. हणमंत धुळशेट्टी सर, श्रीशैल बंडगर सर, सोलंकर सर आणि शंकराचार्य स्वामी सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल लक्ष्मी शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. राजकुमार काशिनाथ कुलकर्णी सर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचेही विशेष कौतुक केले.

कल्पकतेला विज्ञानाची जोड, मेहनतीला मार्गदर्शन आणि जिद्दीला प्रयत्नांची साथ मिळाली की यशाची नवी शिखरे गाठता येतात!

बेंगळुरू येथे २० नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात तीन पारितोषिके मिळविणे, सलग चार वेळा शंकरराव शरणप्पा आष्टे प्रशालेला प्रथम क्रमांक प्राप्त होणे आणि तिन्ही सादरीकरणांची दिल्ली येथील पुढील राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड होणे हा प्रशालेच्या शैक्षणिक वाटचालीतील सुवर्णक्षण आहे. विद्यार्थ्यांच्या जिद्दीला शिक्षकांच्या मार्गदर्शनाची आणि लक्ष्मी शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रेरणेची मिळालेली ही यशस्वी साथ निश्चितच इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

तिन्ही यशस्वी सादरीकरणांतील विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन! दिल्ली येथील पुढील स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! **– शंकरराव शरणप्पा आष्टे प्रशाला, भुरीकवठे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.**